# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ / श्रावण १३, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास आणि वक्फ मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री** | |
| **(३)** | **पर्यावरण मंत्री** | |
| **(४)** | **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४६**

---

### मुळशी (जि. पुणे) लवासा सिटीअंतर्गत सुरु असलेली अनधिकृत बांधकामे

**(१) * ८५२०२ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळशी (जि. पुणे) लवासा सिटी अंतर्गत अनधिकृत बांधकाम सुरु असून पर्यावरणासाठी हानिकारक असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, माहे मे २०१७ मध्ये लवासा सिटी प्रकल्पाला देण्यात आलेला विशेष नियोजन प्राधिकरणाचा (स्पेशल प्लॅनिंग ऑथॉरिटी) दर्जा राज्य शासनाने काढून घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या नियमांचे झालेले उल्लंघन आणि पर्यावरणाची हानी लक्षात घेता शासनाने लवासा सिटी कॉर्पोरेशनवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) पर्यावरण विषयक हानी झाल्याचे निदर्शनास न आल्यामुळे कारवाई करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तळाशिल, आचरा व पोळम (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) या गावातील नागरिकांना क्षारयुक्तपाणी प्यावे लागत असल्याने टँकरने पाणीपुरवठा करण्याबाबत

**(२) * ८४९७६ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्याच्या किनारपट्टीवरील तळाशिल, आचरा व पोळम या गावात क्षारयुक्तपाणी प्यावे लागत असल्याने मालवण पंचायत समितीने सदर गावांना टँकरने पाणी पुरवठा करण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी असा निर्णय घेऊन जिल्हाधिका-यांना पाणी टंचाई व क्षारयुक्त पाण्याबाबतचे निवेदन दिनांक १२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार गावातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) दिनांक १२.०५.२०१७ चे निवेदन जिल्हाधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

सन २०१७ च्या टंचाई कालावधीमध्ये मालवण तालुक्याच्या (जि. सिंधुदुर्ग) किनारपट्टीवरील तळाशिल, आचरा व कोळंब या गावांची मागणी नसल्याने टँकरने पाणी पुरवठा करण्यात आलेला नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यामध्ये निर्माण झालेली पाणी टंचाई

**(३) * ८९४२५ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील १२ गावे व ७१ वाड्या, मुरूड तालुक्यातील ३३ गावे व १२ वाड्या, उरण तालुक्यातील ८ वाड्या, पनवेल तालुक्यातील १७ गावे व ४४ वाड्या, कर्जत तालुक्यातील ४४ गावे व ३६ वाड्या, खालापूर तालुक्यातील २६ गावे व ४० वाड्या, पेण तालुक्यातील ३९ गावे व १५४ वाड्या, श्रीवर्धन तालुक्यातील १९ गावे व ८१ वाड्या, सुधागड तालुक्यातील १० गावे व ३० वाड्या, रोहा तालुक्यातील ८ गावे, म्हसळा तालुक्यातील ७ गावे व २० वाड्या, माणगाव तालुक्यातील १६ गावे व ४० वाड्या, महाड तालुक्यातील ३६ गावे व २२० वाड्या आणि पोलादपूर तालुक्यातील ४८ गावे व २७२ वाड्यांमध्ये माहे एप्रिल, २०१७ पासून तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील गावांना व वाड्यांना तसेच पनवेल तालुक्यातील ग्रामपंचायतींना सुरळीत व मुबलक पाणी पुरवठा करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी,पनवेल यांनी माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पाणी टंचाई निवारण आराखडा तयार करण्यात येऊन उक्त ठिकाणी कायमस्वरूपी पाणी पुरवठा करण्याकरिता कोणकोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) रायगड जिल्ह्याच्या सन २०१६-१७ च्या संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडयात १५ तालुक्यातील ३६७ गावे व ११०९ वाडया अशा एकूण १४७६ गावे/ वाडयांचा समावेश करण्यात आला होता.

(२) व (३) सदर निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

तथापि, रायगड जिल्हयामध्ये संभाव्य पिण्याच्या पाणी टंचाई कृती आराखडा तयार करुन त्यामध्ये नविन विंधन विहीरी घेणे व टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे या दोन उपाययोजना मार्च २०१७ ते जून २०१७ या कालावधीत राबविण्यात आलेल्या आहेत.

त्यानुसार जिल्हयामधील १३ तालुक्यामध्ये ९० गांवे व २९२ वाडया असे एकूण ३८२ ठिकाणी पिण्याचे पाणी पुरविण्यात आले आहे. तसेच २४ गांवे व ८५ वाडया असे एकूण १०९ ठिकाणी नविन विंधन विहीरी घेण्यात आल्या असून त्यापैकी यशस्वी ठरलेल्या ९१ विंधन विहीरी पैकी ८१ ठिकाणी हातपंप/विजपंप बसवून पाणी पुरवठा सुविधा देण्यांत आली आहे. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत सन २०१६-१७ मध्ये ३८ गावे/वाडयांमध्ये १४ पाणी पुरवठा योजना चालू आहेत व सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात रायगड जिल्ह्यातील ४५ गांवे/वाडयामध्ये ४५ पाणी पुरवठा योजना राबविण्यांकरिता कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. तसेच मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत जिल्हयामधील ६ तालुक्यामध्ये १२ नळ पाणी पुरवठा योजना प्रस्तावित केल्या असून त्यापैकी ८ योजनांना शासन स्तरावरील तांत्रिक समितीने मान्यता दिली आहे.

तसेच पेण तालुक्यामध्ये एम.एम.आर.डी.अे. यांचेकडील निधीमधून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत खारेपाट भागातील शहापाडा दक्षिण व उत्तर या प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेतील ३८ टँकरग्रस्त गावे/वाडया टँकरमुक्त करण्यासाठी हेटवणे धरणावरुन पुरक उद्भव घेवून पाणी पुरवठा करणे योजनेस मंजूरी मिळाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भूगाव व इंझापूर (जि.वर्धा) येथील उत्तम गाल्वा मेटॅलिक लि., उत्तम व्हल्यू स्टिल लि. व इंद्रजित पॉवर प्लॉन्ट या कंपन्यांकडून होत असलेल्या प्रदुषणाबाबत

**(४) * ९१४८२ श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूगाव व इंझापूर (जि.वर्धा) येथील उत्तम गाल्वा मेटॅलिक लि., उत्तम व्हल्यू स्टिल लि. व इंद्रजित पॉवर प्लॉन्ट या कंपनीकडून मोठया प्रमाणात होत असलेल्या प्रदुषणाबाबत नागरिकांनी, सरपंच व अनेक पदाधिकाऱ्यांनी मा.पालकमंत्री, प्रदूषण विभाग, जिल्हाधिकारी यांच्याकडे वांरवार निवेदन देवून तसेच वर्धा जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सदर प्रकरणी कंपनीची चौकशी करण्याची मागणी करण्यात येवूनसुध्दा अद्यापही सदर कंपनीवर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नसल्याचे दिनांक ५ जून २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीकडून होत असलेल्या प्रदूषणाची चौकशी करण्यासाठी उपविभागीय अधिकारी वर्धा यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशी समितीने नागरिक, शेतकरी, तक्रारदार यांच्यासोबत चर्चा करून मोका तपासणी करून चौकशी केलेला अहवाल जिल्हाधिकारी, वर्धा यांच्याकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त कंपनीकडून मोठया प्रमाणात प्रदूषण होत असल्याचे चौकशीमध्ये आढळून आलेले असल्यामूळे याबाबत शासनाने कंपनी विरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम** : (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे आहे.
(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर कंपनीस दि.१६/०३/२०१६ रोजी प्रस्तावित निर्देश दिलेले आहेत. त्याचप्रमाणे, सदर कंपनीच्या प्रतिनिधिची दि.५/०५/२०१६ रोजी वैयक्तीक सुनावणी घेण्यात आलेली आहे. सदर सुनावणीस अनुसरून मंडळामार्फत दि. ११/०५/२०१६ रोजी सदर कंपनीस अंतरिम निर्देश बजावण्यात आलेले असून, रू.५.०/- लक्ष ची बँक हमी जमा करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. तसेच सदर उद्योगाला दिल्या जाणाऱ्या भेटी दरम्यान उद्योगाच्या सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणेच्या देखभाल चलनामध्ये आढळलेल्या त्रुटीमुळे प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नागपूर यांनी दि.२३/०६/२०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौ. पिंपळगाव (जि. नाशिक) येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या उत्तरपत्रिका रद्दीत सापडल्याबाबत

**(५) * ८६५४३ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे),**

**श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पिंपळगांव (जि.नाशिक) येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या एफ.वाय.बी.एस.सी.च्या उत्तरपत्रिका रद्दीत सापडल्याची बाब माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महाविद्यालयामार्फत माहे फेब्रुवारी-मार्च २०१५ मध्ये घेण्यात आलेल्या विज्ञान शाखेतील प्रथम वर्षाच्या पदवी परिक्षेतील गणित विषयाच्या उत्तरपत्रिका न तपासताच प्राध्याप्रकांनी विदयार्थ्यांना उत्त्तीर्ण् केले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, व तदनुसार शासनाने सदर उत्तरपत्रिका गहाळ करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

यासंदर्भात विद्यापीठाने नियुक्त केलेल्या त्रिस्तरीय सत्यशोधन समितीने प्रथम वर्ष बी.एस्सी. गणित विषयाच्या, प्रात्यक्षिक परीक्षेच्या उत्तरपत्रिका प्राध्यापक डॉ. सुर्वे यांनी न तपासता प्रथम पानावर एकत्रित गुणदान केले असल्याचे निष्कर्ष काढले आहेत.

(३) दिनांक १७ एप्रिल, २०१७ रोजी स्टार माझाच्या दैनंदिन वार्तापत्रामध्ये व दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजीच्या सर्व वर्तमानपत्रामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संलग्नीत असलेल्या के. के. वाघ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पिंपळगाव बसवंत या महाविद्यालयाच्या गणित विषयाच्या प्रात्याक्षिक परीक्षेची न तपासलेली व एकत्रित गुणदान केलेली उत्तरपत्रिका रद्दीत मिळाल्याचे वृत्त प्रसिध्द झाले. बातमी प्रसिध्द झाल्यानंतर बातमीच्या अनुषंगाने सत्यता जाणून घेण्यासाठी कुलगुरु यांनी सत्यशोधन समिती नियुक्त केली.

सत्यशोधन समितीने सखोल चौकशी करुन कुलगुरु यांना दिनांक ०७ जुलै, २०१७ रोजी अहवाल सादर केला आहे. समितीचा अहवाल कुलगुरुंनी स्विकारला असून दोषींवर पुढील कार्यवाही करण्यासाठी दिनांक ०८/०७/२०१७ रोजी महाविद्यालयाच्या व्यवस्थापनास कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अचलपूर (जि. अमरावती) तालुक्यातील शिधावाटपाच्या धान्याची होत असलेली विक्री

**(६) * ९३१६४ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर (जि. अमरावती) तालुक्यातील आदिवासी व सर्वसामान्यासाठीचे शिधावाटपाचे धान्य खुल्या बाजारामध्ये विकण्यात आल्याचे दिनांक १५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अमरावती गुन्हे शाखेच्या पथकाने अचलपूर शहरालगत परतवाडा येथील जयस्तंभ चौक परिसरात ३४५ कट्टे तांदुळ खुल्या बाजारात विक्रीसाठी नेत असताना जप्त केल्याचे दिनांक ११ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (1) हे खरे नाही.

(२) होय. दि.१०.५.२०१७ रोजी अमरावती गुन्हे शाखेच्या पथकाने परतवाडा येथे ५० किलोचे ३४५ कट्टे तांदूळ असलेला ट्रक क्रमांक CG ०८/AC-७७०७ जप्त केला.

(३) पोलीस स्टेशन अधिकारी, परतवाडा यांनी जप्त केलेला तांदूळ सरकारी स्वस्त धान्य दुकानाचा आहे किंवा कसे याबाबत शहानिशा करण्यासाठी तहसिलदार, अचलपूर यांना कळविले. त्या अनुषंगाने निरीक्षण अधिकारी, अचलपूर यांनी अचलपूर व परतवाडा येथील स्वस्त धान्य दुकानातील तांदूळ कमी आहे किंवा कसे याबाबत तपासणी केली असता स्वस्त धान्य दुकानातील तांदुळाची आवक, वितरण व शिल्लक साठा, साठा पंजीनुसार बरोबर असल्याचा आढळून आला. ट्रकसोबत दाखल केलेल्या कागदपत्रावरुन प्रकरण संशयास्पद वाटत असल्यामुळे तहसिलदार, अचलपूर यांनी त्यांच्या दि.१२.५.२०१७ रोजीच्या पत्रान्वये पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन परतवाडा यांना त्यांचेस्तरावरुन अधिक चौकशी करुन निर्णय घेण्याबाबत कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घाटकोपर, मुंबई येथील रुबी नर्सींग होम केंद्रात अवैधपणे गर्भपात होत असल्याबाबत

**(७) * ८५१७१ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपर (मुंबई) येथील रुबी नर्सींग होम केंद्रावर अन्न व औषधी द्रव्ये प्रशासनाने दिनांक २६ एप्रिल २०१७ रोजी वा त्या सुमारास टाकलेल्या छाप्यात गैरपध्दतीने गर्भपात सुरु असल्याबाबत निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच विक्रोळी (मुंबई) येथील रुबी मेडिकल सेंटरच्या नर्सिंग होमवर चेंबूर पोलीस ठाण्याच्या पोलीसांच्या बंदोबस्तात एफडिए गुप्त वार्ता पथकाने दिनांक २७ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास टाकलेल्या छाप्यामध्ये लाखो रुपयांचा बेकायदेशीर औषधांचा साठा तसेच गर्भपाताच्या वापरलेल्या १५ ते २० किट्सचा साठा तसेच अनेक बेकायदेशीर गोष्टींचा साठा व नोंदी आढळून आल्या असून महिला आयुर्वेदिक डॉक्टर व नर्सिंग होमच्या चालक डॉ. सविता चव्हाण यांच्या विरोधात गुन्हा दाखल करुन सर्व साहित्य जप्त केल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर छाप्याच्यावेळी रुग्णालयात दाखल असलेल्या गरोदर महिलावर अनधिकृतपणे उपचार व गर्भपात आणि शस्त्रक्रिया केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त रुबी मेडिकल सेंटरमध्ये बेकायदेशीररित्या गर्भपात व गर्भलिंगनिदान चाचणी करण्यात येत असल्याचे आवश्यक ते सर्व पुरावे मिळवूनही संबंधीत डॉक्टर सविता चव्हाण यांना अद्यापी अटक न करण्याची कारणे काय आहे

(५) उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) दि. २६ एप्रिल, २०१७ रोजी अन्न व औषध प्रशासनाच्या अधिका-यांनी पोलीसांसमवेत मे. रुबी नर्सींग होम, टागोर नगर, विक्रोली, मुंबई या ठिकाणी छापा टाकला. पेढीच्या तपासणीदरम्यान तेथे गर्भपातासाठी वापरण्यात येणा-या Synokem Pharmaceuticals Ltd, हरिव्दार या पेढीकडून उत्पादित करण्यात आलेल्या A-Kare Tablet या औषधाचे ११ किट आढळून आले व १५ किटचा रिकामा बॉक्स आढळून

आला. सदर ११ किटमधून ८ किटचा नमूना तपासणी व विश्लेषणासाठी ताब्यात घेण्यात आला असून उर्वरीत ०३ किटचा साठा जप्त करण्यात आला आहे. तपासणी व विश्लेषणासाठी ताब्यात घेण्यात आलेले नमुने चाचणी व विश्लेषणाकरिता औषध नियंत्रण प्रयोगशाळा मुंबई येथे पाठविण्यात आले आहेत.

मे. रुबी नर्सींग होम येथे तपासणीदरम्यान आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने मे.रुबी नर्सींग होमच्या मालक डॉ. सविता चव्हाण व त्यांचे इतर सहकारी यांचेविरूध्द भा.द.वि. कलम ४२०, ३४ आणि औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील तरतुदीनुसार तसेच MTP कायदा, १९७१ तील तरतुदीनुसार पोलीसांकडे प्रथम खबर अहवाल क्र. ११७/२०१७ दि. २७/०४/२०१७ रोजी नोंदविण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) अन्न व औषध प्रशासनाकडून मे.रुबी नर्सींग होमच्या मालक डॉ. सविता चव्हाण व त्यांचे इतर सहकारी यांचेविरूध्द पोलीसांकडे दाखल करण्यात आलेल्या प्रथम खबर अहवालाच्या अनुषंगाने पोलीसांकडून प्राप्त करून घेण्यात आलेल्या माहितीनुसार पोलीसांनी डॉ. सविता चव्हाण व त्यांचे सहकारी श्री. मिश्रा यांना दि. ०३/०७/२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता अटक केली होती मा. सत्र न्यायालय क्र. २१ मुंबई यांचे अटकपूर्व जामीन मंजूरी आदेशानुसार त्यांना रू. २०,०००/- च्या जामीनावर मुक्त करण्यात आले आहे.

(५) अन्न व औषध प्रशासनाकडून करण्यात आलेल्या तपासणीच्या वेळी तपासणी व विश्लेषणासाठी ताब्यात घेण्यात आलेले गर्भपातासाठी वापरण्यात येणाऱ्या किटचा नमुना चाचणी व विश्लेषणाकरिता औषध नियंत्रण प्रयोगशाळा मुंबई येथे पाठविण्यात आले असून, प्रयोगशाळेचा अहवाल प्रतिक्षाधीन आहे. अन्न व औषध प्रशासनाकडून दाखल करण्यात आलेल्या प्रथम खबर अहवालाच्या अनुषंगाने पोलीसांकडून सदर प्रकरणाची अधिक चौकशी सुरू असून, पोलीसांकडील चौकशी पूर्ण होताच संबंधितांविरूध्द न्यायालयात खटला दाखल करण्याची कारवाई करण्यात येईल.

-----------------

## राज्यातील शासकीय व पालिका रुग्णालयात वैद्यकीय सामुग्रीची विनापरवाना खरेदी विक्री होत असल्याबाबत

**(८) * ८५२१६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय व पालिका रुग्णालयातील आर्थोपेडिक विभागात रुग्णांवर उपचार करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वैद्यकीय उपकरणांची विनापरवाना खरेदी-विक्री सुरु असल्याप्रकरणी राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाने अनेक रुग्णालयांतून वैद्यकिय उपकरणे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान जप्त केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईतील जीटी रुग्णालयाच्या इमारतीमध्ये अन्न व औषध विभागाच्या अधिका-यांनी दिनांक ८ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास टाकलेल्या छाप्यामध्ये मेडिकल, सर्जिकल अॅण्ड हॉस्पिटल इक्विपमेन्ट या नावाने अस्थिव्यंगावरील कृत्रिम गुडघे, खुबे आदी वैद्यकीय सामुग्रीची (इम्पलान्ट) विनित पिंपळे ही व्यक्ती बेकायदा खरेदी-विक्री करीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जी.टी. रुग्णालयात वैद्यकीय सामुग्री सापडल्यानंतर मुंबईतील ग्रँट रोड येथील मेडीमड कंपनीसह अन्न व औषध विभागाच्या अधिका-यांनी

नांदेड, नाशिक, पुणे, अहमदनगर, यवतमाळ, बीड आदी २२ ठिकाणी छापे टाकून राबविलेल्या मोहिमेत कोटयवधी रुपयांची विनापरवाना वैद्यकीय सामुग्रीचा साठा जप्त केला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासकीय रुग्णालयांमध्ये शस्त्रक्रियेसाठी स्वस्त मिळणारा इम्पलान्टचा साठा मुबलक असतानाही रुग्णालय प्रशासन व डॉक्टरांतर्फे त्याचा लाभ गोरगरीब रुग्णांना न देता कृत्रिम बनावटीची वैद्यकीय सामुग्री ४० टक्के जादा किंमतीने विक्री करुन ग्राहकांची आर्थिक फसवणूक करित असल्याबाबतची तक्रार कर्ण प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. राहुल घुले यांनी शासनाकडे केली, हे ही खरे आहे काय,

(५)असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) दि. ०२ फेब्रुवारी, २०१७ रोजी जी.टी. रूग्णालय, मुंबई येथील डॉक्टरांसाठीच्या वसतीगृहातील रूम नं. ३०६ येथे अन्न व औषध प्रशासनाव्दारे धाड टाकण्यात आली. त्यावेळी तेथे श्री. विनित पिंपळे हे मे. मेडीकॉल सर्जिकल ॲण्ड हॉस्पीटल इक्विंमपेंट या नावाने विनापरवाना आर्थोपेडिक इम्प्लांटची खरेदी व विक्री करीत असल्याचे आढळून आले. तेथून अंदाजे रू. ०४ लाख किमतीचा साठा जप्त करण्यात आला.

प्राप्त माहितीच्या अनुषंगे अन्न व औषध प्रशासनाव्दारे विनापरवाना आर्थोपेडिक इम्प्लांटची खरेदी विक्री करणा-या राज्यातील इतर ३७ विक्री आस्थापनांवर व ०२ आर्थोपेडिक इम्प्लांटच्या उत्पादक पेढ्यांवर धाडी टाकून ३९ पेंढ्यांकडून एकूण रू. ६,५९,६४,०००/- इतक्या किमतीचा आर्थोपेडिक इम्प्लांटचा साठा जप्त करण्यात आला आहे.व संबंधितांविरूध्द न्यायालयात खटले दाखल केले आहेत.

(४) अशा आशयाची तक्रार अन्न व औषध प्रशासनास प्राप्त झालेली नाही.

(५) श्री. विनित  पिंपळे यांचेविरूध्द दि. २४/०३/२०१७ रोजी आझाद मैदान, पोलीस ठाणे, मुंबई गुन्हा क्र. १०/१७ नोंदविण्यात आला आहे. राज्यातील ३७ विक्री पेढ्यांनी विनापरवाना आर्थोपेडीक इम्प्लांटचा साठा खरेदी विक्री केल्याप्रकरणी चौकशी पूर्ण करून त्यांचेविरूध्द संबंधित न्यायालयामध्ये खटला दाखल करण्यात आलेला आहे.

----------------

## राज्यात शिक्षक भरतीसाठी टीईटी ही परीक्षा अनिवार्य करण्यात आल्याबाबत

**(९) * ८६७७९ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांचे मार्फत शिक्षक पात्रता परिक्षा अर्ज सादर करण्याबाबत दिनांक १५ जून,२०१७ रोजी वा त्या सुमारास जाहीर करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ही ४ थी शिक्षक पात्रता परीक्षा असून याकरिता डी.एड. व बी.एड पदवी धारक आध्यापकांकडून महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे अवाजवी शुल्क आकारत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सन २०१२ पासून शिक्षण क्षेत्रातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची भरती बंद असुन दिनांक ३० मे २०१७ रोजी वा त्या सुमारास झालेल्या मंत्री मंडळाच्या बैठकीत शिक्षकांच्या रिक्त जागेवर नियुक्तीसाठी टी ई टी ही परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असल्याचा निर्णय घेण्यात आला मात्र भरतीसाठी लागणाऱ्या विलंबामुळे विदयार्थांच्या गुणवत्तेवर परिणाम होत असल्याने टी ई टी परीक्षेचा निर्णय मागे घेण्यात यावा याकरिता अध्यक्ष, बुलढाणा संस्थाचालक मंडळ, यांनी मा. मुख्यमंत्री यांना माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच राज्यात सन २०१० पासून शिक्षक भरती झाली नसल्याने तसेच शासनाने डी.एड. व बी.एड पदवी धारक अध्यापकांनी टी ई टी ही परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असल्याचा निर्णय घेतल्यामुळे परिक्षार्थींमध्ये तीव्र असंतोषाचे वातावरण पसरलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने उपरोक्त टी ई टी परीक्षेचा निर्णय मागे घेण्या संदर्भात तसेच तात्काळ शिक्षक भरती राबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) सदर परीक्षाकरिता शासन मान्यतेने निर्धारित करण्यात आलेले शुल्क आकारण्यात येते, हे खरे आहे.

(३), (४) व (५) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थासह खाजगी व्यवस्थापनाच्या अनुदानित, अशंत: अनुदानित व अनुदानास पात्र घोषित केलेल्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षण सेवक भरती अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी परीक्षा यामध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे करण्याबाबत शासन निर्णय दि.२३.६.२०१७ रोजी पारित करण्यात आलेला आहे. सदर परीक्षा शासन निर्णयात प्रस्तावित केल्यानुसार ६ महिन्याच्या आत घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने दि.२३.८.२०१० व दि.२९.७.२०११ च्या अधिसूचनेद्वारे प्राथामिक शिक्षकांकरिता किमान शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता निश्चित केली असून " शिक्षक पात्रता परीक्षा" अनिवार्य केली आहे. त्याप्रमाणे राज्यात प्राथमिक शाळेतील शिक्षक पदावरील नियुक्तीकरिता दि. १३.२.२०१३ तसेच दि. २३.८.२०१३ च्या शासन निर्णयान्वये "शिक्षक पात्रता परीक्षा" उत्तीर्ण होणे अनिवार्य केलेली आहे.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील २०० पाणीपुरवठा योजना निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(१०) * ८४८३८ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण पाणीपुरवठ्याच्या सुमारे २०० योजना निधीअभावी प्रलंबित असून पूर्ण झालेल्या आणि प्रगतीपथावर असणाऱ्या योजनांचा सुमारे १०० कोटी रुपयांचा निधी प्रलंबित असल्याने नवीन आराखडा ही प्रलंबित असल्याची बाब माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी दिनांक २ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.पाणीपुरवठा मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त जिल्हयात गत १२ वर्षात रूपये १० कोटीहून अधिकचा निधी टंचाई निवारणावर खर्च होऊनही अदयापी उक्त जिल्ह्यातील चंदगड, आजरा, गडहिंग्लज, हातकणंगले तसेच पन्हाळा तालुक्यासह गावे आणि वाडया टंचाईग्रस्त असून तिळवणी (ता.हातकणंगले) येथील संतप्त महिलांनी ग्रामपंचायतीवर दिनांक १७ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास घागर मोर्चा काढला होता, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच चंदगड व पट्टणकोडोली येथील राष्ट्रीय पेयजल योजनेची कामे प्रलंबित असून मौजे लिंगनूर व नेसरी (ता.गडहिंग्लज) येथील राष्ट्रीय पेयजल योजनेच्या नळपाणी पुरवठा योजनेसाठी निधी उपलब्ध करुन योजनेचे काम करण्याची मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडे स्थानिक नागरीक व स्थानिक लोकप्रतिनिधी, चंदगड यांनी माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रश्न भाग (२) मधील निवेदनाच्या अनुषंगाने व उक्त जिल्ह्यातील गावे व वाडयांना कायमस्वरूपी पाणी टंचाईमुक्त करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) गतवर्षी जिल्ह्यातील चंदगड, आजरा, गडहिंग्लज, हातकणंगले व पन्हाळा तालुक्यातील काही भागात पर्जन्यमान कमी झाल्याने काही गाव आणि वाड्यांमध्ये टंचाई भासली होती. तिळवणी, ता.हातकणंगले या गावामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत प्रादेशिक योजना चालविली जाते.सदर प्रादेशिक योजनेच्या विद्युत देयकाच्या थकबाकीमुळे सदर योजनेचे कनेक्शन तोडले असल्यामुळे या गावांचा पाणी पुरवठा बंद झाल्याने या गावातील महिलांनी दिनांक २४/५/२०१७ रोजी ग्रामपंचायतीवर मोर्चा काढलेला होता.तथापी, योजनेत समावीष्ठ गावांनी थकित विद्युत देयकापोटी दिनांक २३/५/२०१७ रोजी रु.४,७५,५८८/-इतकी रक्कम विद्युत मंडळाकडे भरणा केल्याने दिनांक २४ मे, २०१७ रोजी पासुन पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आलेला आहे.

(४) चंदगड, ता.चंदगड या योजनेचे काम पुर्ण झालेले आहे. पट्टकोडोली, ता.हातकणंगले या योजनेचे काम प्रगतीपथावर असुन मार्च, २०१८ अखेर पुर्ण होणेचे अपेक्षीत आहे.गडहिंग्लज तालुक्यातील राष्ट्रीय पेयजल योजनेसाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत दिनांक ६/६/२०१७ च्या पत्रान्वये स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मागणी केलेली आहे.

(५) भौतिकदृष्ट्या पुर्ण झालेल्या व पाणी पुरवठा सुरु झालेल्या योजनांचे दायित्व विचारात घेवून निधी उपलब्धतेनुसार या योजनांची कामे पुर्ण करण्यात येत आहे.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील अवैध गुटखा विक्रीस प्रतिबंध घालण्याबाबत

**(११) * ८५८६६ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा, मोताळा, मलकापूर परिसरात परराज्यातून लाखो रूपयांचा गुटखा आयात होत असल्याने या भागातील शाळा, कॉलेज, महाविद्यालय परिसरात अन्न व औषध प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अवैध गुटखा विक्री सुरू असल्याचे दिनांक १० जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने अवैध गुटखा विक्रीस प्रतिबंध घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) अन्न व औषध प्रशासनाव्दारे बुलढाणा, मोताळा, मलकापूर परिसरात मागील वर्षभरात अवैध मार्गाने विक्री होणा-या गुटख्यावर १८ प्रकरणी कारवाई करून रू. १७,४६,९४८/- इतक्या किमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. अवैध मार्गाने होणा-या गुटखा विक्रीवर प्रतिबंध घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाद्वारे नियमितपणे कारवाई केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरातील साई अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या परिक्षांमध्ये झालेला गैरप्रकार

**(१२) * ९०४९१ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे**

**(कळमनुरी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठा अंतर्गत येणाऱ्या औरंगाबाद शहरातील साई अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या दिनांक १६ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास घेण्यात आलेल्या स्थापत्य अभियांत्रिकीच्या तिसऱ्या वर्षाच्या परिक्षेच्या प्रश्नपत्रिका काही विद्यार्थी सुरेवाडी येथील एका घरात दिनांक १७ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास रात्री प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली सोडवित असल्याची बाब पोलीसांनी टाकलेल्या छाप्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक विद्यार्थ्यांकडून उक्त पेपर घरी सोडवण्याचे ४० ते ५० हजार रुपये घेतल्या प्रकरणी एकूण ३३ जणांना अटक केली असल्याचे दिनांक १९ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले असून यामध्ये विद्यापीठातील काही अधिकारी, प्राध्यापकांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परीक्षा संपल्यानंतर त्याच दिवशी उत्तरपत्रिका परीक्षा केंद्रातून विद्यापीठाच्या स्ट्रॉगरूम मध्ये जमा होणे अत्यावश्यक असतांनाही नियंत्रकांनी हेतुपुरस्सर उत्तरपत्रिका स्ट्रॉगरूममध्ये जमा केल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित विद्यालय व परीक्षा नियंत्रकाचे कर्मचारी व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक १७/०५/२०१७ रोजी सकाळी ठिक ९.०३ मि. विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांच्या पोलीस अधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने, साई अभियांत्रिकी महाविद्यालयाचे एकूण २७ विद्यार्थी बी.ई. अभ्यासक्रमाच्या

सिव्हील ब्रँचच्या बिल्डींग कंस्ट्रक्शन या विषयाची दिनांक १६/०५/२०१७ रोजी झालेल्या पेपरची उत्तरपत्रिका पुन्हा नगरसेवकाच्या घरी लिहित असतांना रंगेहाथ पकडल्याची पोलीस प्रशासनाकडून माहिती प्राप्त झाली.

(२) या प्रकरणी पोलीस ठाणे हर्सुल येथे गुन्हा नोंद रजिस्टर क्र. ७५/२०१७ अन्वये गुन्हा नोंद असून पोलीस प्रशासनामार्फत तपास सुरु आहे.

(३) या प्रकरणी गठीत केलेल्या त्रिस्तरीय सत्यशोधन समितीने त्यांच्या अहवालात उत्तरपत्रिका संकलनासाठी विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकारी वा कर्मचाऱ्यांवर ठपका ठेवलेला नाही.

(४) कुलगुरूंच्या आदेशान्वये या प्रकरणी सखोल चौकशी करण्यासाठी प्रा. महेंद्र शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. प्रविण वक्ते व प्रा. साधना पांडे यांचा समावेश असलेली त्रीसदस्यीय सत्यशोधन समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने त्यांचा अहवाल कुलगुरूंना सादर केलेला असून अहवालातील शिफारशींप्रमाणे कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुरकुंभ (ता.दौंड,जि.पुणे) येथील औद्योगिक वसाहतीतील रासायनिक प्रकल्पांमुळे होणारे प्रदूषण रोखण्याबाबत

**(१३) * ९३१९६ श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरकुंभ (ता.दौंड, जि.पुणे) येथील औद्योगिक वसाहतीतील रासायनिक प्रकल्पांमुळे परिसरातील वायू आणि जलप्रदूषणामध्ये वाढ झाली असून सदर प्रकल्पातून उत्सर्जित होणारे सांडपाणी जमिनीत मुरवले जात असल्याने तेथील जमीन नापीक होत असल्याबाबत स्थानिक नागरिकांनी जिल्हाधिकारी, पुणे व प्रदूषण नियंत्रक मंडळाला तक्रारी करून कारवाई करण्याबाबत माहे मे, २०१७ ते दिनांक १५ जून, २०१७ या कालावधीत अनेक निवेदने दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कुरकुंभ औद्योगिक वसाहतीतील रासायनिक प्रकल्पामुळे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली तसेच संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) याबाबत श्री मोहन शंकर भोसले, कुरकुंभ, ता. दौंड यांची तक्रार दि. २७/०४/२०१७ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाली होती.
(२) व (३) याबाबत तालुका कृषी अधिकारी दौंड यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास सादर केलेल्या अहवालानूसार व त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून करण्यात आलेल्या पाहाणीनुसार तक्रारदाराने तक्रारीत नमूद केलेल्या कंपनीतून कुठलाही प्रकारचा सांडपाण्याचा थेट विसर्ग तक्रारदाराच्या मालकीच्या जमिनीवर केला जात नसल्याचे निर्दशनास आले आहे. तथापि, सदर पाहणी दरम्यान कुरकुंभ एमआयडीसीमधील सामूहिक सांडपाणी सयंत्रणेमध्ये त्रूटी आढळून आल्याने याबाबत गुन्हा का दाखल करण्यात येऊ नये, अशी नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच, तक्रारअर्जामध्ये नमूद कुरकुंभ एमआयडीसीतील मे. हॉनर लॉब प्रा. लि. या कंपनीवर संमतीपत्राच्या अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याचे निर्दशनास आल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून यापूर्वीच गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

-----------------

## वाकुर्डे (बु.) (जि. सातारा) येथील पाणीपुरवठा योजनेचे थकीत वीज देयक भरुन पाणीपुरवठा पूर्ववत करण्याबाबत

**(१४) * ९००३६ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाकुर्डे (बु.) (जि. सातारा) येथील पाणी पुरवठा योजना थकीत वीज देयकामुळे बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाकुर्डे (बु.) सह आसपासच्या गावात पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना पायपीट करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने थकीत वीज देयक भरून पाणीपुरवठा पूर्ववत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) वाकुर्डे बुद्रूक नळ पाणी पुरवठा योजना अथवा वाकुर्डे बुद्रूक नावाचे गाव सातारा जिल्ह्यात अस्तित्वात नाही.

-----------------

## मौजे शिवणे (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील पाणी योजनेचे अंदाजपत्रक व आराखडा तयार करण्यास विलंब होत असल्याबाबत

**(१५) * ८५६८८ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिवणे (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील नादुरूस्त नळपाणी पुरवठा योजनेचे नूतनीकरण करण्यासाठी सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असून अंदाजपत्रक व आराखडा तयार करण्याची कार्यवाही अद्याप करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त योजनेचे अंदाजपत्रक व आराखडा तयार करण्यास विलंब करणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, सदर कामाला मंजूरी देवून काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे नाही.

सदर योजनेचे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नुतनीकरणाचे अंदाजपत्रक जिल्हास्तरावर सादर करण्यात आले होते. तथापि केंद्र शासनाच्या दि. २९.६.२०१५ च्या सूचनानुसार नवीन कामांना तात्पुरती स्थगिती देण्यात आल्यामुळे सदर कामास मंजूरी देण्यात आलेली नाही.

(३) सन २०१६-१७ च्या टंचाई आराखडयामध्ये सदर योजनेच्या तात्पुरत्या दुरुस्तीचे अंदाजपत्रकास जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी प्रशासकीय मान्यता दिली होती. तथापि विहीत मुदतीत निविदेस प्रतिसाद न मिळाल्यामुळे काम हाती घेण्यात आले नाही.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत शिवणे नळ पाणी पुरवठा योजनेबाबत जिल्हास्तरावरुन प्रस्तावित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दहिसर (मुंबई) येथील इस्त्रा शाळेतून दहावीच्या उत्तरपत्रिकांची झालेली चोरी

**(१६) * ८६१६३ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील दहिसर येथील इस्त्रा शाळेतून दहावीच्या ५१६ उत्तरपत्रिका चोरीला गेल्याच्या घटनेनंतर विर्लेपार्ले येथे एक शिक्षक हॉटेलमध्ये बसून उत्तरपत्रिका तपासत असल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला असल्याचे दिनांक ११ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उत्तर पत्रिका दिनांक ३ एप्रिल, २०१७ रोजी चोरीस गेल्याची तक्रार विद्यालयाच्या मुख्याध्यापकानी दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास दहिसर पोलीस ठाण्यात नोंदविली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शाळेतून दहावीच्या ५१६ उत्तरपत्रिका चोरीला गेल्या असूनही तसेच विरार येथील मांऊट मेरी शाळेच्या मुख्याधापक आणि इतर काही कर्मचा-यांनी बारावीची प्रश्नप्रत्रिका परीक्षेच्या वेळेआधीच व्हॉटसअॅपवर व्हायरल केल्यानंतर ही या प्रकरणाची चौकशी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशतः खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर दोन्ही प्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.तसेच विभागीय मंडळामार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(४) माऊंट मेरी शाळेप्रकरणी दोषी आढळलेल्या विद्यार्थ्यांची संपादणूक रद्द करुन जुलै-२०१९ पर्यंतच्या परीक्षेस बसण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे.तर दोषी कर्मचा-यास निलंबित करण्यात आले आहे.

उत्तरपत्रिका चोरीप्रकरणी संबंधित शाळेवर कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील केम्ब्रीज विद्यालयाने शैक्षणिक शुल्क न भरलेल्या विद्यार्थ्यांचे शाळा सोडल्याचे दाखले घरी पाठविल्याबाबत

**(१७) * ८८७९९ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील केम्ब्रीज स्कुल या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक शुल्क भरले नसल्याने विद्यार्थ्यांचे शाळा सोडल्याचे दाखले हे शाळा प्रशासनाने घरी पाठविल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, पालकांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास शाळा प्रशासन तसेच पोलीस आयुक्त यांची भेट घेऊन शाळेवर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबधित शाळेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३) प्रस्तुत प्रकरणी पालक प्रतिनिधी, मुख्याध्यापक यांचे समवेत झालेल्या बैठकीमध्ये फी भरली नाही अशा विदयार्थ्यांना शाळेत बसण्यास प्रतिबंध करु नये असे निदेश देण्यात आले. याबाबत शाळेस लेखी सूचनाही देण्यात आल्या.

त्यानुसार संबंधित विदयार्थ्यांना शाळेत पुन:प्रविष्ट केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने नियमांचे उल्लंघन करुन स्वच्छता व सफाई कंत्राटदारांची नेमणूक केल्याबाबत

**(१८) * ९०६५२ श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने शासनाच्या तीन लाखांवरील सर्व व्यवहारासाठी ई-निविदा प्रक्रिया राबवावी या नियमाचे उल्लंघन करुन स्वच्छता व सफाई कंत्राटदारांची नेमणूक केली असल्याचे तसेच या विद्यापीठाने ऑन लाईन परिक्षेसाठी (एन्ड टू एन्ड) कामे सोपविण्यासाठी बंगळूर येथील माईड लॉजिक या एजन्सीला ई निविदेविनाच कंत्राट सोपविले असल्याचे दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन दोषींवर कारवाई करावी अशा प्रकारच्या तक्रारी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय खरे आहे.

स्वच्छता व साफसफाईची निविदा दि.०५.०४.२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली. तथापि, कोणत्याही कंत्राटदारास स्वच्छता व साफसफाईची कंत्राट देण्यात आलेले नाही, सदरहू प्रक्रिया तात्पुरती स्थगित करण्यात आलेली आहे.

तसेच माईन्ड लॉजिक या एजन्सीला ई-निविदे विनाच कंत्राट सोपविले आहे.

(२) अशंत: खरे आहे.

(३) होय.

शासनाने एकसदस्यीय समितीमार्फत चौकशी केली आहे. चौकशी समितीचा अहवाल संचालक, उच्च शिक्षण यांचेकडे दि.१३.०७.२०१७ रोजी प्राप्त झाला असून, सदर अहवाल शासनास नुकताच प्राप्त झाला आहे. सदरहू अहवालाची छाननी सुरु असून छाननीनंतर प्रस्तुत प्रकरणी गुणवत्तेनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगांव जिल्ह्यातील शालेय पोषण आहारातील तांदूळ काळ्या बाजारात विकल्याप्रकरणी स्थापन केलेली समिती

**(१९) * ९२५८६ श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्ह्यातील शाळांमध्ये राज्य शासनाव्दारे इयत्ता १ ली ते इयत्ता ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी पुरविण्यात येणारा शालेय पोषण आहार योजनेतील तांदुळ ट्रकने काळ्या बाजारात विकल्या प्रकरणी एमआयडीसी, जळगांव पोलीसांनी ट्रक जप्त करण्याची केलेली घटना स्वास्तिक गोडाऊनवर घातलेले छापे, धान्यादी वस्तुंच्या पुरवठ्यामध्ये अनियमितता व इतर गैरव्यवहारा संदर्भात चौकशी करण्यासाठी शिक्षण संचालक (प्राथ.) यांच्या अध्यक्षतेखाली माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान समिती स्थापन करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समितीने शासनाला उक्त चौकशीचा अहवाल सादर केला आहे काय,
(३) असल्यास, उक्त समितीने सादर केलेल्या अहवालानुसार दोषी आढळून आलेल्या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) जळगांव जिल्ह्यात शालेय पोषण आहार योजनेतील तांदूळ काळया बाजारात विक्रीसाठी नेला जात असताना पोलिसांनी पकडल्याबाबत काही लोकप्रतिनिधींकडून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने शिक्षण

संचालक (प्राथ) यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करुन चौकशी करण्यात आली. सदर चौकशी समितीच्या शिफारशीनुसार शिक्षण संचालक (प्राथ) यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि. ठाणे) येथील कशेळी-काल्हेर व खारेगांव टोलनाका ते माणकोली नाका परिसरात तिवरांची तोड करुन अनधिकृत बांधकाम करण्यात येत असल्याबाबत

**(२०) * ९१५६३ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि. ठाणे) येथील कशेळी-काल्हेर पटट्यातील १९५ एकर पाणथळ जागेवर स्थानिक भूमाफियांनी भराव टाकून सामुहिक खाजण जमिनीवर शासनाची कोणतीही परवानगी न घेता गृहसंकुले उभारल्याचे दिनांक ९ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच ठाणे भिवंडी राष्ट्रीय महामार्ग-३ लगत खारेगांव टोलनाका ते माणकोली नाका परिसरामध्ये पाण्याच्या पाईपलाईन व खाडी परिसरात मोठया प्रमाणावर मुरुम व दगडी भराव टाकून तिवरांची झाडांची तोड करुन अनधिकृत बांधकाम करण्यात येत असून त्या अनधिकृत बांधकामाकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खारफुटीचे संरक्षण करण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे उल्लंघन करुन भूमाफिया या पाणथळ जागेवर भराव टाकून त्या परिसरात काटेरी कुंपण घालत असूनही जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून दखल घेण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच ठाणे येथील कशेळी-काल्हेर परिसरातील पाणथळ जमिनीवर भूमाफियांकडून केल्या जाणा-या अतिक्रमणांविरुद्ध जिल्हा प्रशासनाने दाखल केलेल्या सुमारे ३० एफआयआरवर पोलिसांकडून काहीच कारवाई झाली नसल्याचा प्रकार माहे जून २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितावंर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे

(३) हे खरे नाही.

(४) व (५) भिवंडी तालुक्यातील मौजे केवणी, दिवे अंजूर, कशेळी, काल्हेर, कोन या गावच्या खाडी किनाऱ्यावर कांदळवनाचा ऱ्हास तसेच कांदळवनावर माती व डेब्रीजचा भराव याबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ चे कलम १५ व १९ अन्वये पोलिस स्टेशन, नारपोली येथे २६, तालुका पोलिस स्टेशन भिवंडी येथे ३ व कोन गाव पोलिस स्टेशन येथे १ असे एकूण ३० गुन्हे दाखल करण्यात आले असून या गुन्हयांमधील ५८ आरोपींना आतापर्यंत अटक करण्यात आली असल्याचे वरीष्ठ पोलिस निरीक्षक, नारपोली पोलिस स्टेशन, भिवंडी यांनी कळविले आहे.

-----------------

## राज्यात बाटलीबंद अशुध्द पाण्याची विक्री सुरु असल्याबाबत

**(२१) * ८८५५४ श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बाटलीबंद पिण्याचे पाणी विक्री करणाऱ्या अंदाजित ८१० उद्योगांना परवानगी दिली असून विनापरवाना उद्योगांची संख्या सुमारे दीड

हजारांवर असून उक्त कंपन्या पाणी शुध्दतेचे कोणतेही निकष न पाळता बाटलीबंद अशुध्द पाण्याची विक्री करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कोल्हापूर जिल्ह्यामध्ये शुध्द पाण्याच्या नावाखाली अशुध्द पाणी विकण्यात येत असल्याने कागल आणि नवलेवाडी (ता. पन्हाळा,जि.कोल्हापूर) येथे अन्न व औषधे प्रशासनाने माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान छापा टाकून पाण्याचे कॅन जप्त केले आहे, हे ही खरे आहे काय?

(३) असल्यास, अन्न व औषध प्रशासन विभागाकडून अशुध्द पाण्याची विक्री करणाऱ्या विनापरवाना उद्योगांविरोधात तसेच प्रश्न भाग (२) मधील केलेल्या कारवाईत किती जणांवर कारवाई करण्यात आली वा येत आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) राज्यात बाटलीबंद पाणीपुरवठा परवाने घेऊन बाटलीबंद पाण्याचे उत्पादन करणार-या सुमारे ५८४ आस्थापना आहेत. अनधिकृत विनापरवाना बाटलीबंद पाण्याचे उद्योग काही आस्थापना करीत असल्याचे अन्न व औषध प्रशासनाकडून वेळोवेळी करण्यात आलेल्या कारवाईच्या अनुषंगाने निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अन्न व औषध प्रशासनाव्दारे राज्यात बेकायदेशीररीत्या सुरू असलेल्या पाणी प्लांटबाबत चौकशी करून १०९ प्रकरणी अन्न सुरक्षा व मानके कायद्याच्या कलम ३६ (३) (बी) अंतर्गत उत्पादन बंद करण्याच्या नोटीसा जारी करण्यात आल्या आहेत संबंधिताविरूध्द पुढील तपास करून नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे.

अन्न व औषध प्रशासनाव्दारे माहे एप्रिल व मे, २०१७ या कालावधीत कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील नवलेवाडी येथील बाटलीबंद पाण्याचे उत्पादन करणा-या आस्थापनाची तपासणी करून तेथून पाण्याचा ०१ नमुना विश्लेषणासाठी ताब्यात घेण्यात आला व एकूण २४०० लीटर किंमत रू.४८०००/- इतका पाण्याचा साठा जप्त करण्यात आला. तपासणीसाठी पाठविण्यात आलेला नमुना विश्लेषणाअंती असुरक्षित असल्याचे निष्पन्न

झाल्याने सदर आस्थापनावर नियमानुसार आवश्यक ती कारवाई करण्यात येत आहे. तसेच कागल तालुक्यातील ०१ आस्थापनांची तपासणी करून तेथून पाण्याचा ०१ नमुना विश्लेणासाठी ताब्यात घेण्यात आला व तेथून एकूण ३६० लीटर किंमत रू. २५००/- इतका पाण्याचा साठा जप्त करण्यात आला. तपासणीसाठी पाठविण्यात आलेला विश्लेषणाअंती नमुना लेबल दोषाचा असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे सदर आस्थापनेकडून लेबल दोषाच्या नमुन्याप्रकरणी कायद्यातील तरतुदीनुसार तडजोड शुल्क आकारण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाटवी (ता.नवापूर जि.नंदूरबार) येथे शाळेची भिंत व प्रवेशद्वार अंगावर कोसळल्याने बालिकेचा झालेला मृत्यु

**(२२) * ८८६७६ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाटवी (ता.नवापूर, जि.नंदूरबार) येथे शाळेची भिंत व प्रवेशद्वार अंगावर कोसळल्याने एका ६ वर्षाच्या आरुषी वळवी या बालिकेचा मृत्यु झाला असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन सदर बालिकेच्या कुटूंबाला कोणती आर्थिक मदत केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) आरूषी वळवी ही मेहंदीपाडा अंगणवाडी केंद्रातील नोंदणीकृत बालिका होती. दिनांक ३१/०३/२०१७ रोजी सदर केंद्रातून आहार घेऊन ती मामाच्या गावी वाटवी येथे गेली होती. शाळा सुटलेली असल्याने गेट जवळ खेळत असताना भिंत व गेट अंगावर कोसळल्याने ती

गंभीर जखमी झाली. तद्नंतर उपचारादरम्यान दिनांक २/०४/२०१७ रोजी तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. परंतु सदर बालिका शाळेतील विद्यार्थिनी नसल्याने या प्रकरणी आर्थिक मदत देता आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयासह खेड तालुक्यातील शालेय पोषण आहाराची देयके प्रलंबित असल्याबाबत

**(२३) * ८८७०४ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयासह खेड तालुक्यातील शाळांची शालेय पोषण आहाराची देयके गत ८ महिन्यांपासून महिला बचत गट व आहार पुरविणाऱ्या संस्थांना मिळाली नसल्याचे माहे, एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, शालेय पोषण आहार योजना गतिमान करण्याच्या व योजना पारदर्शक करण्यासाठी सर्व माहिती ऑनलाइन करण्याचा निर्णय शिक्षण आयुक्तांनी घेवूनही शालेय पोषण आहाराची देयके जिल्हा स्तरावर ऑनलाइन अदा करण्याची कार्यवाही न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर देयके जिल्हा स्तरावर ऑनलाइन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत जिल्हास्तरावरील देयके ऑनलाईन पध्दतीने तयार करुन संबंधितांच्या खात्यावर वर्ग करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# राज्यात अन्न व औषध प्रशासन विभागातील डब्ल्यूएचओ-जीएमपी अधिकाऱ्यांनी केलेला गैरप्रकार

**(२४) * ८६३९३ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात औषध निर्यात करणा-या कंपन्यांची तपासणी करणा-या अन्न व औषध प्रशासन विभागातील डब्ल्यूएचओ-जीएमपी अधिकाऱ्यांनी वॅनवरी फार्मास्युटीकल्स कंपनीला चांगल्या उत्पादनाचा दाखला दिला परंतु कंपनीने नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणाची युरोपीयन देशातील नियंत्रक संस्थेने दखल घेतल्याने सुमारे ३५ हजार कोटींच्या औषध निर्यातीवर परिणाम झाल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विभागात नि.मो.गांधी सहायक आयुक्त व इतर अधिका-यांवर वर्षानुवर्षे महत्वाची कामे सोपविण्यात आली असल्यामुळे औषध उत्पादक कंपन्यांचे व उक्त अधिका-यांचे हितसंबंध असल्याचे निदर्शनास आल्यावर दक्षता विभागाने तीन औषध कंपन्यांची माहे ऑगस्ट ते नोव्हेंबर २०१६ या कालावधीत अचानक तपासणी केली असता सदर गैरप्रकार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) मे. वॅनबेरी फार्मास्युटीकल्स या औषध निर्यात करणा-या संस्थेला जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार औषध निर्यातीसाठी WHO-GMP दाखला देण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या योग्य त्या तत्वांचे अनुपालन करून अन्न व औषध प्रशासनाच्या WHO-GMP विभागातील अधिका-यांनी चांगल्या उत्पादनाचा दाखला दिला ही बाब खरी आहे. मात्र सदर कंपनीने नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणाची युरोपीयन देशातील नियंत्रक संस्थेने दखल घेतल्याने सुमारे ३५ हजार कोटीच्या औषध निर्यातीवर परिणाम झाल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे, ही बाब खरी नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मेसर्स पीओमा केमिकल्स कंपनीच्या भिवंडी येथील गोदामावर छापा टाकून औषधांचा साठा जप्त केल्याबाबत

**(२५) * ८७८९४ श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मेसर्स पीओमा केमिकल्स या औषध उत्पादन कंपनीने परदेशातून औषधे आयात करण्यासाठी केंद्र शासनाच्या संबंधित यंत्रणांकडून परवानगी न घेता अन्य देशातून औषधांची आयात करून औषधांची बेकायदा विक्री केल्याप्रकरणी कंपनीच्या भिवंडी येथील गोदामावर अन्न व औषध

प्रशासनाने छापा टाकून लॅक्टिटोल मोनोहायर्डेट या औषधांचा १२,७३० किलोचा ४० लाख रुपये किंमतीचा साठा जप्त केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अन्न व औषध प्रशासनाव्दारे दि. १६/०५/२०१७ रोजी मे. पिओमा केमिकल्स, विलेपार्ले, मुंबई या घाऊक औषध विक्री करणा-या पेढीची तपासणी करण्यात आली. तपासणीच्यावेळी सदर जागेत कुठलाही औषध साठा उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. सदर पेढी औषध साठा त्यांच्या भिवंडी येथील गोदामामध्ये साठवित असल्याचे त्यांनी तपासणीच्यावेळी सांगितले. सदर संस्थेच्या भिवंडी येथील गोदामाची तपासणी केली असता तेथे लॅक्टिटोल मोनोहायर्डेट औषधाचा १२,७३० किलोचा साठा आढळून आला. सदर कंपनीने लॅक्टिटोल मोनोहायर्डेट या औषधाच्या आयातीसाठी आयात परवाना घेणे बंधनकारक असतानाही आयात परवाना न घेता केंद्र शासनाच्या अधिका-यांकडून Dual use NOC घेऊन सदर औषध आयात केले असून त्याची विक्री औषधी पाठ उत्पादन करणा-या संस्थाना केल्याचे तपासणी दरम्यान निदर्शनास आले. तपासणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने लॅक्टिटोल मोनोहायर्डेट औषधाच्या १२७३० किलो साठ्यातून १ नमुना विश्लेषणासाठी ताब्यात घेऊन उर्वरीत साठा प्रतिबंधित करण्यात आलेला आहे.
(२) आयातीसाठी परवाना घेणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीतील असल्याने सदर प्रकरणी केंद्र शासनाच्या अधिका-यांना कळविण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. विश्लेषणासाठी ताब्यात घेण्यात आलेल्या नमुन्याचा विश्लेषण अहवाल प्रतिक्षाधीन आहे. विश्लेषण अहवाल प्राप्त होताच, पेढीत तपासणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने पेढीवर नियमानुसार पुढील कारवाई करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## समद्रपुर (ता.हिंगणघाट, जि.वर्धा) येथील पुरवठा निरिक्षकाने केलेल्या गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत

**(२६) * ९००५८ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समद्रपुर (ता.हिंगणघाट, जि.वर्धा) येथील पुरवठा निरिक्षकाने माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान गैरव्यवहार केल्याने जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी जिल्हा पुरवठा कार्यालय, वर्धा येथे सदर निरिक्षकाची सेवा वळती करुन कारणे दाखवा नोटीस दिले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यासाठी जिल्हाधिकारी, वर्धा यांनी उपविभागीय अधिकारी, हिंगणघाट यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपविभागीय अधिकारी, हिंगणघाट यांनी आपला अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर केला असून त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी पुरवठा निरिक्षकाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) या प्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यात आलेली आहे. प्राथमिक चौकशीत पुरवठा निरिक्षक, समुद्रपूर यांच्याविरुध्दच्या तक्रारीत सत्यता आढळून आली आहे. प्राथमिक चौकशीचा अहवाल दि. ७.७.२०१७ रोजी प्राप्त झाला आहे. संबंधीत पुरवठा निरिक्षकाविरूध्द शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.

-----------------

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अनुदान आयोगाच्या प्रपाठक, अधिव्याख्याता व वर्ग-३ च्या पदभरतीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२७) * ८४९८५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या अनुदान आयोगाच्या प्रपाठक, अधिव्याख्याता व वर्ग-३ च्या पद भरती मध्ये गैरव्यवहार झाले असल्याचे माहे एप्रिल-२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असून सदर प्रकरणी उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ.धनराज माने यांना निलंबीत करुन त्यांची चौकशी करण्यात येईल असे मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास जाहिर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे एप्रिल, २०१७ च्या पहिल्या आठवडयात शासन निर्णय काढून डॉ. धनराज माने यांची वर्तणूक व कामगिरी समाधानकारक असल्याचे प्रमाणपत्र देऊन नियुक्ती पुढे चालु ठेवण्यात येत असल्याबद्दल स्पष्टपणे नमूद करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) तसेच उक्त विद्यापीठातील पाली व बुद्धीजम विभागामध्ये करण्यात आलेल्या नियुक्त्याही नियमबाह्य असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शासन निर्णय दिनांक ०५.११.२०१५ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार म्हणून श्री.धनराज माने यांची शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (प्रशासन शाखा) या पदावर दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीकरिता नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार दिनांक ०६.०१.२०१५ रोजी ते रुजू झाले व त्यांचा संचालक, उच्च शिक्षण पदावरील परिविक्षाधीन कालावधी दिनांक ०५.०१.२०१७ रोजी पूर्ण झाला. डॉ.धनराज माने यांचे संचालक, उच्च शिक्षण या पदावरील परिविक्षाधीन कालावधीतील कामकाज तपासले असता त्यांचे सदर पदावरील कामकाज समाधानकारक असल्यामुळे त्यांचा संचालक, उच्च शिक्षण पदाचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्यात येऊन त्यांची नियुक्ती शासन निर्णय दि.०५.०४.२०१७ अन्वये पुढे सुरु ठेवण्यात आली आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) नमूद विद्यापीठाच्या पाली व बुध्दीझम विभागासाठी विद्यापीठ निधीतून दोन सहायक प्राध्यापकांची पदे Walk-in-Interview जाहीरातीद्वारे व विहीत निवड समितीच्या शिफारशीनुसार ११ महिन्यांच्या कालावधीसाठी विद्यापीठाकडून भरण्यात आली होती. सदर नियुक्त्यांच्या विरोधात मा. उच्च न्यायालयात याचिका क्र.६६९८/२०१६ दाखल करण्यात आली होती. त्यामध्ये मा. न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार विद्यापीठाने सदर दोन अध्यापकांना सेवेतून कार्यमुक्त केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्हयातील विशेष घटक योजनेतील पिण्याच्या पाण्याच्या योजनांना मान्यता देण्यास दिरंगाई होत असल्याबाबत

**(२८) * ८८८००  श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हा वार्षिक आराखड्यामध्ये सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता विशेष घटक योजनेअंतर्गत मागासवर्गीय वस्त्यांकरिता पिण्याच्या पाण्याच्या योजनांना शासनाने मंजूरी देऊन निधी वितरित करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनांना सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात अंदाजपत्रके तयार करण्यास जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून आणि प्रशासकीय मान्यता देण्यास जिल्हा परिषदेकडून दिरंगाई केली जात असल्याने सदर योजना सुरु होण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, पाटण मतदारसंघातील एकूण २२ मागासवर्गीय वस्तीतील पिण्याच्या पाण्याच्या योजनांचा सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील आराखडयात समावेश असून अद्यापही या कामांची अंदाजपत्रके करून यास प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पाण्याच्या योजनांना निधी मंजूर असताना या कामांच्या प्रशासकीय मान्यता देण्यास दिरंगाई होत आहे याबाबत चौकशी करून दोषींवर कारवाई करावी अशी मागणीही करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधित दोषींवर कोणती कारवाई केली आहे तसेच सदर योजनांना मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) व (३) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या दि.२९/०६/२०१५ व २९/७/२०१५ च्या पत्रान्वये नवीन योजना हाती घेण्यात येऊन नयेत अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्यामुळे, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१५- २०१६ व २०१६-२०१७ च्या आराखडयातील योजनांना मान्यता देण्यात आलेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील गावांमध्ये निर्माण झालेली पाणी टंचाई

**(२९) * ९३०६४ ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील माणिकगडावरील खडकी, मच्छिगुडा, चलवतंगुडा, घोडणकप्पी, आनंदगुडा, संगणपूर, लोलडोह, पाटागुडा, वणी खु, पोचुगुडा, लेंडीगुडा, धनपठार, जनकापूर या १३ गावांमध्ये माहे फेब्रुवारी ते जून २०१७ मध्ये वा त्यादरम्यान पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात जिल्हाधिकारी चंद्रपूर व तहसिलदार यांनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान सदर गावांचा दौरा केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त जिल्हयात वैनगंगेच्या पात्रात सन १९९२ पासून तपाळ पाणीपुरवठा योजना कार्यान्वित असून यामध्ये १२ गावांचा समावेश करण्यात आला आहे परंतु नेहमीच तांत्रिक बिघाड निर्माण होत असल्यामुळे पाणीपुरवठा बंद असल्याने उक्त गांवातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याकरिता वणवण करावी लागत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त गावांमध्ये दरवर्षी पाणी टंचाई निर्माण

होऊन टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत असल्याने पिण्याच्या पाण्याची कायमस्वरुपी योजना कार्यान्वित करण्यासाठी तसेच तपाळ पाणी पुरवठा योजनेच्या दुरूस्तीकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.
उन्हाळा- २०१७ च्या टंचाई कृती आराखडयात जिवती (चंद्रपूर) तालुक्यातील मौजा आनंदगुडा, संगणापूर, लोलडोह, पाटागुडा, वणी खु, पोचुगुडा, लेंडीगुडा, घनपठार, जनकापूर या गावांत टँकर प्रस्तावित करण्यात आले होते. परंतु, आवश्यकतेनुसार मौजा घनपठार व गोंडगुडा, ता. जिवती येथे दिनांक ९/५/२०१७ ते दिनांक १५/६/२०१७ पर्यंत एका शासकीय टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे.
(२) होय.
(३) व (४) अंशत: खरे आहे.

नागभिड तालुक्यातील टपाळ येथील वैनगंगा नदीवरुन ११ गावांना नागभिड-नवखळा प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो.

तथापि, सदर योजनेच्या टपाळ येथील हेडवर्क्सवरील व्ही.टी.पंप जळाल्यामुळे दिनांक ५/६/२०१७ ते १०/६/२०१७ या कालावधीत योजनेद्वारे पाणी पुरवठा बंद होता. सदर पंप दुरुस्ती करुन दिनांक ११/६/२०१७ पासून पूर्ववत पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. सदर ११ गावात पाणी टंचाई नसल्याने टँकरने कुठेही पाणी पुरवठा करावा लागलेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एडगाव (ता. वैभववाडी,जि.सिंधुदुर्ग) येथील नळपाणीपुरवठा योजनेचे प्रलंबित असलेले काम पुर्ण करण्याबाबत

**(३०) * ८६३५३ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एडगाव (ता. वैभववाडी,जि.सिंधुदुर्ग) गावाची पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर होण्यासाठी शासनाने २२ लाख रूपयांची नवीन नळपाणीपुरवठा योजनेस सन २०१३-२०१४ मध्ये वा त्यादरम्यान मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेचे काम सुरू होवून आजमितीस ४ वर्षांचा कालावधी लोटला असतानाही सदरहू योजनेचे काम प्रलंबित असल्याने तेथील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे,
सदरची योजना नुतनीकरणाची असून,
टाकीची जागा उपलब्ध न झाल्याने उंच टाकीचे काम प्रलंबित आहे. तथापि, जुन्या नळ पाणीपुरवठा योजनेतुन पाणी पुरवठा सुरु आहे.
(३) प्रस्तावित टाकीच्या जागेत बदल होत असल्याने ग्रामपंचायतीकडून जागा बदलाबाबतचे दस्तऐवज दिनांक २४.४.२०१७ रोजी प्राप्त झाले. सद्यस्थितीत सदर तांत्रिक बदलास मंजुरी प्राप्त असून पावसाळयानंतर उंच टाकीचे काम हाती घेण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे उमरद (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथे शुध्द व नियमित पाणीपुरवठा करण्याबाबत

**(३१) * ९३२८९ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उमरद (ता.सिंदखेडराजा जि.बुलढाणा) येथे अशुध्द पाण्याचा पुरवठा होत असल्याने गावामध्ये मोठया प्रमाणात गॅस्ट्रोची लागण सुरु झाल्याचे माहे जून,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी नियमित पाणी पुरवठा करण्यात येत नसल्याने तसेच विद्युत पंप बंद असल्यामुळे नागरिकांना ८ ते १५ दिवस पाणी मिळत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच दलित वस्तीत सिमेंट रस्त्याचे काम अपूर्ण असल्यामुळे ठिकठिकाणी सांडपाणी साचत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

पंप व पाईपलाईन नादुरुस्त असल्याने ४ दिवस पाणी पुरवठा बंद होता. त्यानंतर सुरळीत पाणी पुरवठा सुरु आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

दलित वस्तीत सिमेंट रस्त्याचे काम दिनांक ३१/३/२०१७ ला पूर्ण करण्यात आले असून, रस्त्याशेजारी कोठेही सांडपाणी सचालेले नाही.

तथापि, नियमित शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे व गावात सांडपाणी साचू नये याबाबत सरपंच व सचिव यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## किन्ही (ता राळेगांव) येथील राष्ट्रीय पेयजल योजने अंतर्गत कामामध्ये अनियमितता झाली असल्याबाबत

**(३२) * ९१३६३ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किन्ही (ज) (ता.राळेगांव, जि.यवतमाळ) येथे राष्ट्रीय पेयजल योजने मधुन पाणी पुरवठयाकरिता सन २०१२-१३ मध्ये ४५ लाख रु. मंजुर झाले असून उक्त योजनेंतर्गत गावामध्ये टाकीचे बांधकाम, पाईप लाईन टाकणे, नळजोडणी अशी कामे करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत टाकण्यात आलेले पाईप निकृष्ट दर्जाचे असल्याने पाईप फुटत असून पाणी पुरवठाही बंद होत असल्याचे नागरीकांनी दिलेल्या निवेदनावरुन दिनांक ९ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेत निकृष्ट दर्जाचे पाईप टाकण्यात आले मात्र उच्च दर्जाचे पाइप टाकल्याचे दर्शवून देयक काढण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, असल्यास, त्यानुसार संबिधतांवर कोणती कारवाई केली व उक्त ठिकाणी पाणी पुरवठा सुरळीत होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) नाही, हे खरे नाही.

सदर योजनेत वापरण्यात आलेले पाईप महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने प्राधिकृत केलेले चेतक कंपनीचे आय.एस.आय.मार्क असलेले पाईप वापरण्यात आले असून त्याची त्रयस्थ संस्थेने तपासणी केली असून पाईप चागल्या प्रतीचे असल्याचा अहवाल दिला आहे.

सदर योजनेतुन निकृष्ट दर्जाच्या पाईपमुळे गळती झाली नसून मे, २०१७ मध्ये उर्ध्ववाहीनीचे पाईपचे जॉईट सटकल्याने गळती झाली होती. परंतु सदर गळती लगेच दुसऱ्या दिवशी ग्रामपंचायतीने दुरुस्त करुन पाणी पुरवठा सुरळीत केला.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळमनुरी व सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील पाणी टंचाई व बंद असलेल्या नळ योजना सुरु करण्याबाबत

**(३३) * ८६६६४ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (हिंगोली) तालुक्यातील नळ योजनांची वीजबीले ग्रामपंचायतीने न भरल्याने व दुरुस्ती न केल्याने तसेच वेगवेगळया कारणांमुळे ४८ नळ योजना बंद असल्याने तेथील नागरिक पाणी टंचाईने त्रस्त झाले असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रा (बु.) व बटवाडी (ता.सेनगाव जि.हिंगोली) पाणी टंचाई निर्माण झाली असून पेडगाव वाडीतील दोन हातपंप, सार्वजनिक विहिरींची पातळी खोल गेल्यामुळे पाणी टंचाई निर्माण झाल्याने महिलांनी तहसील कार्यालयावर घागर मोर्चा काढला असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त जिल्हयातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय,

(२) होय,

हे अंशत: खरे आहे.

मौजे पेडगाववाडी ता.जि.हिंगोली येथील महिलांनी माहे मे, २०१७ या महिन्यात तहसील कार्यालय, हिंगोली वर घागर मोर्चा काढला होता.

(३) जिल्हयातील पाणी टंचाई दुर करण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

जिल्हयात ६१ गावामध्ये ६६ विंधन विहीरी घेण्यात आल्या आहेत. त्यापैकी ६४ विंधन विहीरीवर पंप बसविण्यात आले आहे.

नळ योजनेच्या विशेष दुरुस्तीतंर्गत ३ कामे मंजूर असुन, त्यापैकी १ काम प्रगतीपथावर आहे व २ कामांबाबत ई निविदा प्रक्रिया चालु आहे.

तात्पुरती पुरक नळ योजनेच्या एका कामा बाबत ई निविदेची प्रक्रिया चालु आहे.

१४१ गावामध्ये १७७ खाजगी विहीर/बोअर अधिग्रहण करण्यात आल्या आहेत.

५ गावामध्ये ४ टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयात पाणीपुरवठा योजनांमध्ये झालेला अपहार

**(३४) * ८८७५० श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात शासकीय अनुदान व लोकवर्गणी यांच्या माध्यमातून केलेल्या पाणीपुरवठा योजनांमध्ये सुमारे ५०० कोटी रुपयांचा अपहार झाला असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त कार्यालयात बैठा सत्याग्रह करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त शासकीय निधीचा अपहार करणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही. मात्र तशी तक्रार प्राप्त झाली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे निर्देशानुसार जिल्हाधिकारी यांनी ५ गावातील पाणी पुरवठा योजनांची चौकशी करुन दि. २९/६/२०१७ रोजी विभागीय आयुक्त, अमरावती यांना अहवाल सादर केला आहे. चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार अंमलबजावणीमधील त्रुटीमुळे योजना अपुर्ण असल्याचे दिसून आले. यास्तव संबंधित यंत्रणाचे समन्वय तथा संनियंत्रण करुन प्रगती पथावरील योजना पुर्ण करण्याची मोहीम हाती घेण्याच्या सूचना विभागीय आयुक्तांनी जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना दिल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हयातील कोळशाच्या खाणीतुन सल्फरयुक्त पाणी कोणतीही प्रक्रिया न करता कन्हान नदीच्या पात्रात सोडल्यामुळे नदी प्रदूषित झाल्याबाबत

**(३५) * ८५६६३ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयातील वेस्टन कोलफील्ड लि. इंदर खुली खान, कामठी ओसीएम, गोंडेगाव ओपन कास्ट या कोळशाच्या खाणीतुन निघणारे सल्फरयुक्त पाणी व कन्हान पिपरी परीसरातील सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता कन्हान नदीच्या पात्रात सोडल्यामुळे परिसरातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार वेस्टन कोलफील्ड लि. तसेच सांडपाणी सोडणाऱ्या कन्हान व पिपरी ग्राम पंचायतीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही. तथापि, कन्हान पिपरी नगरपरिषद हद्दीतील घरगुती सांडपाणी विना प्रक्रिया कन्हान नदीपात्रात मिसळते ही वस्तुस्थिती आहे.

(२) कन्हान व पिपरी परीसरातील घरगुती सांडपाण्यावर कोणतीही प्रक्रिया संयंत्रणा नसल्यामुळे हे विनाप्रक्रिया घरगुती सांडपाणी नाल्याव्दारे कन्हान नदीमध्ये मिसळत असल्याने कन्हान पिपरी नगरपरिषदेस दि.२६/७/२०१७ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) कायदा, १९७४ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धाटाव (ता.रोहा,जि.रायगड) औद्योगिक परिसरातील रासायनिक कंपन्यांमुळे होणारे वायू प्रदुषण

**(३६) * ९१२११ श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाटाव (ता.रोहा, जि.रायगड) येथील औद्योगिक परिसरात विविध रासायनिक कंपन्या कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धाटाव औद्योगिक परिसरातील मे.दिपक नायट्रेट, फिश स्टार, रवि केडीया फायनान्सिक कंपनी, स्पेक्ट्रम ते डीआरटी अथिया कंपनीच्या रस्त्यालगत असलेल्या भूमिगत गटारामधून दिनांक ४ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास गडद पिवळया रंगाचा तीव्र विषारी वायूचा धुर मोठया प्रमाणात बाहेर पडत होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कंपनीच्या रस्त्यालगत असलेल्या भूमिगत गटारातून पिवळया गडद रंगाचे विषारी वायूचे प्रदुषण होत असल्याचे संबंधीत ग्रामपंचायतीचे सरपंच व पदाधिकारी यांनी उक्त कंपनी प्रशासनाच्या निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग (३) च्या अनुषंगाने उक्त रासायनिक कंपन्यांनी वायूचे प्रदुषण रोखण्याकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व परिसरातील नागरिकांच्या आरोग्याच्यादृष्टीने कोणती उपाययोजना केली आहे, तसेच दोषी कंपन्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) सदर बाब कंपनी प्रशासनाच्या निदर्शनास आणली, हे खरे नाही.

(४) संबंधीत रासायनिक कंपन्यानी हवा प्रदूषण नियंत्रणासाठी डस्टकलेक्टर (घुलीकनाची प्रदूषण रोखन्यासाठी) तसेच स्क्रबींग यंत्रणा (उत्पादन प्रक्रीयेदरम्यान निर्माण होणाऱ्या वायुचे निष्काशन/नियंत्रण करण्यासाठी) तसेच जल प्रदूषण नियंत्रणासाठी औद्योगिक सांडपाणी प्रक्रीया यंत्रणा (ई.टी.पी.) बाबतची उपाययोजना केलेली आहे.

(५) मंडळास प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने संयुक्त पाहणी केली असता दोषी आढळलेल्या उद्योगास प्रस्तावित आदेश बजावण्यात आले असून वैयक्तिक सुनावणी अंती अंतरिम आदेश बजावून एक महीन्याच्या आत योग्य ती उपाय योजना करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे विलंबाचा प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## मुंबईसह राज्यात बोगस पॅथॉलॉजी लॅबचे प्रमाण वाढल्याबाबत

**(३७) * ८४९४७ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये विशेषतः मुंबई मध्ये अन्न व औषध प्रशासनाने टाकलेल्या छाप्यामध्ये बोगस पॅथॉलॉजी लॅबचे प्रमाण वाढले असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय?

(२) असल्यास, अन्न व औषध प्रशासनाने आतापर्यन्त किती बोगस पॅथॉलॉजी लॅब सेंटरवर कारवाई केली आहे,
(३)असल्यास, याबाबत नेमलेल्या डॉ. पी. टी. वाकोडे समितीच्या महत्वपूर्ण सूचना व शिफारशीवर शासनाने अद्याप कोणतीच कार्यवाही केलेली नसल्याची बाब दिनांक १ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, बोगस पॅथॉलॉजी लॅबच्या प्रमाणामध्ये वाढ झाली असून त्यांच्यावर कायमस्वरूपी बंदी घालण्यासाठी व उक्त समितीने दिलेल्या शिफारशी अंमलात आणण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही,

तथापि वाकोडे समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला असून, सदर प्रकरणी कार्यवाही सुरु आहे.
(४) शासनामार्फत महाराष्ट्र परावैद्यक परिषद अधिनियम २०११ व महाराष्ट्र परावैद्यक परिषद (सुधारणा) अधिनियम २०१७ हे दि. १ जुलै, २०१७ रोजी अंमलात आणण्यात आले.

उक्त विधेयकामध्ये परिषदेचे अधिकार व कार्य निश्चित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार राज्यातील परावैद्यक व्यवसायींची नोंदणी, नोंदणीकृत परावैद्यकीय व्यवसायाविषयक वर्तणूकीचे विनियमन करण्यासाठी नितीसंहिता आखणे, त्यांचेविरुध्द निलंबनाची कार्यवाही करणे किंवा अशा प्रकारची शिस्तभंगाची कार्यवाही करणे अशा स्वरुपाचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात रद्द करण्यात आलेल्या ९२ लाख शिधापत्रिकांवर धान्य पुरवठा करण्यात येत असल्याबाबत

**(३८) * ८४८४७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न व नागरी पुरवठा विभागाने दिनांक १५ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास राज्यातील तपासणी मोहिमेत ९२ लाख शिधापत्रिका रद्द करुनही सदर शिधापत्रिकांवरील धान्य पुरवठा पुर्ववत सुरु असल्याने याबाबत चौकशी करण्याचे आदेश मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांनी दिले असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील सर्व शिधावाटप केंद्रांना पॉस मशीन देण्याबाबतचा निर्णय घेऊन ७-८ महिने होऊनही निर्णयाची अंमलबजावणी अद्याप झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच नाशिक जिल्हा प्रशासनाकडून देण्यात येणा-या पॉईट ऑफ सेल (पॉस) मशिनची अंमलबजावणी न करण्याचा निर्णय उक्त जिल्हयातील रेशन दुकानदारांनी माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेऊन दिनांक २७-२८ जून, २०१७ च्या दरम्यान जिल्हाधिका-यांकडे राजीनामे दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच कोल्हापूर जिल्हयातील स्वस्त धान्य दुकानदारांना वितरण करण्यात आलेल्या बायोमेट्रिक मशिन नादुरुस्त असल्याने १०३ दुकानदारांनी पुरवठा अधिकारी, कोल्हापूर यांना परत केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार प्रश्न भाग (१) मधील संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच प्रश्न भाग (२) ते (४) बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अंशत: खरे आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ नुसार केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या इष्टांकानुसार त्या मर्यादेतच अन्नधान्याचा लाभ देण्यात येतो.

(२) राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे End to End Computerization करण्याबाबत शासनाने दिनांक १८ मे, २०१६ रोजी लाभार्थ्यांची बायोमेट्रिक ओळख पटवून शिधावस्तूंचे वाटप करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. राज्यातील सर्व रास्तभाव दुकानांत ई-पॉस मशीन बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सद्यस्थितीत ५१३६३ दुकानांमध्ये ई-पॉस मशीन बसविण्यात आल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## धामणगांव बढे (ता.मोताळा, जि.बुलडाणा) येथील जीर्ण झालेल्या पाण्याच्या टाकीचे बांधकाम करण्याबाबत

**(३९) * ८७१५६ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणगांव बढे (ता. मोताळा, जि. बुलढाणा) या गावाला पाणीपुरवठा करण्यासाठी ३२ वर्षापूर्वी बांधण्यात आलेली पाण्याची टाकी जीर्ण झाली असून त्यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचे दिनांक २० मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे. काय,

(२) असल्यास, सदर टाकीचे बांधकाम नव्याने करण्याबाबत संबंधीत विभागाने प्रस्ताव तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर टाकीचे बांधकाम नव्याने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे

सदर नळ योजनेची उंच टाकी ३० वर्ष जुनी असल्यामुळे, ग्रापंचायतीने १४ व्या वित्त आयोगामधून या टाकीची दुरुस्ती प्रस्तावित केली आहे. सदर टाकीच्या दुरुस्तीच्या कामाची कार्यवाही ग्रामपंचायत स्तरावर सुरु आहे.

नविन पिण्याच्या पाण्याची टाकी घेण्याबाबत कोणताही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने शिक्षण संचालकांच्या आदेशाचे उल्लंघन करुन जुन्या ठेकेदाराला कंत्राट दिल्याबाबत

**(४०) * ९२५९६ श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय पोषण आहारातील तुरडाळ बाजारामध्ये ६० ते ६५ रुपये किलो मिळत असतांना १५५ रुपये किलोने तुरडाळ खरेदी करु नये व जुन्या ठेकेदाराला पुरवठ्यासाठी मुदतवाढ देऊ नये या शिक्षण संचालकांच्या आदेशाचे उल्लंघन करुन जळगांव जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने श्री साई मार्केटींग अॅण्ड ट्रेडिंग कंपनी, पाळधी, ता.धरणगांव, जि.जळगांव या जुन्याच ठेकेदाराला माहे जुलै, २०१७ अखेरपर्यंत शालेय पोषण पुरवठ्याचे कंत्राट दिले आहे अशी तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्र्यांकडे दिनांक २९ जून, २०१७ रोजी तसेच माहिती अधिकारी कार्यकर्ते श्री.रविंद्र शिंदे, जळगांव यांनी शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे दिनांक २७ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तुरडाळ खरेदी प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अशा स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

(२) शालेय पोषण आहार योजनेतंर्गत जळगांव जिल्ह्यात तांदूळ वाहतूक व ग्रामीण भागात धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी नियुक्त केलेल्या पुरवठेदाराची मुदत दि. १४/०६/२०१७ रोजी संपली आहे. सदर मुदत संपल्यानंतर पुरवठेदारास पुरवठा आदेश देण्यात आलेले नाहीत. माहे मे आणि जूनच्या पहिल्या आठवडयामध्ये दिलेल्या पुरवठा आदेशानुसार पुरवठेदाराने पुरवठा केलेला आहे. तथापि, सदर पुरवठयामध्ये तुरडाळीचा समावेश नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुंभार पिंपळगांव (ता.घनसावंगी, जि.जालना) येथील राष्ट्रीय पेयजल योजना पूर्ण करण्याबाबत

**(४१) * ९१५६५ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंभार पिंपळगांव ( ता.घनसावंगी, जि.जालना) येथे सन २०११ मध्ये १ कोटी १७ लाख रूपयांची राष्ट्रीय पेयजल योजना मंजूर करण्यात आली असून सदर काम सुरु होऊन ६ वर्षे झाली तरीही सदर काम अद्याप अपूर्ण अवस्थेत असल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजना अपूर्ण असल्याने वर्षानुवर्षे पाणी टंचाईमुळे गावक-यांना तीव्र पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजना अद्याप अपूर्ण असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार योजनेचे काम अपूर्ण ठेवणा-या कंत्राटदाराविरुद्ध कोणती कारवाई केली तसेच उक्त योजना पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

योजनेच्या कामाला दिनांक २०.८.२०११ रोजीच्या ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांच्या आदेशान्वये कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. कंत्राटदार व ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांचे हलगर्जीपणामुळे योजनेचे काम अपूर्ण अवस्थेत आहे.

(२) नाही.

माहे मार्च २०१५ पासून सदर योजनेतून गावास पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

(३) व (४) होय,

सदर प्रकरणाची जिल्हा परिषद स्तरावर चौकशी करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस देण्यात आले आहेत. कंत्राटदार व ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या नियोजना अभावी व निष्काळजीपणामुळे कामास विलंब झालेला आहे.

ग्रामपंचायतीस ग्रामसभा घेऊन ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती बदलुन नव्याने समिती निवडुन, नवीन समितीमार्फत गतीने काम करुन योजना पुर्ण करण्याच्या सुचना जिल्हा परिषद स्तरावरुन देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे म्हावशी (ता.पाटण, जि.सातारा) येथील नळ पाणी पुरवठा योजनेच्या कामाची चौकशी करणेबाबत

**(४२) * ९२२९१ श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)मौजे म्हावशी (ता.पाटण,जि.सातारा) येथील कोयना नदीकाठी जलस्वराज्य योजने अंतर्गत नवीन इंटेक विहीर खुदाई व जलशुध्दीकरण यंत्रणेसह नवीन नळ पाणी पुरवठा मंजूर करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या कामामध्ये नवीन विहीरीची खुदाई करुन विहीरीवरुन नळ पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करणेचे काम अंतर्भूत असताना संबंधीत ठेकेदाराकडून नवीन विहीर खुदाई न करता कोयना नदीमध्ये चर काढून जुन्या नळ पाणी पुरवठा योजनेच्या विहीरीमध्ये पाणी घेण्यात येऊन जुन्या विहीरीवरुनच सध्या पाणी पुरवठा करण्यात येत आहे, हे ही खऱे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गावात जलशुध्दीकरण यंत्रणाही बसविली गेली नसल्याने सांडपाणी व ओढ्याचे पाणी सदर जुन्या विहीरीत जात असून गावातील ग्रामस्थांना अशुध्द पाण्याचा पुरवठा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजनेच्या देखभाल दुरुस्ती करीता ग्रामपंचायतीकडून लाखो रुपयांचा खर्च करण्यात आला असून केलेल्या खर्चाची सविस्तर माहिती ग्रामस्थांनी संबंधितांकडे माहितीच्या अधिकाराखालील दिनांक १६ नोव्हेंबर, २०१२ रोजीच्या अर्जाव्दारे मागविली असता अद्याप उक्त माहिती मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच सदरच्या मंजूर झालेल्या नळ पाणी पुरवठा योजनेच्या अपूर्ण व निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी होणेबाबत गावातील ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, सातारा यांचेकडे दिनांक २९ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राव्दारे मागणी केली आहे, हे ही खरेआहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त मागणीच्या अनुषंगाने संबधितावर कोणती कारवाई केली तसेच शुध्द व पाणी पुरवठा करण्याकरिता कोणती कार्यवाही केली करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

मौजे म्हावशी (ता.पाटण,जि सातारा) येथे जलस्वराज्य योजनेअंतर्गत मंजूर योजनेमध्ये नवीन विहीरीची (जॅक वेल) खोदाई करण्याचे काम अंतर्भूत नव्हते. कोयना नदीमध्ये या योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या इंटेक वेलमधून कनेक्टींग पाईपद्वारे अस्तित्वातील जुन्या विहीरीमध्ये (जॅक वेल) पाणी घेण्यात येवून गावात सध्या पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

या योजनेअंतर्गत नवीन जलशुद्धीकरण यंत्रणा बांधण्यात आली आहे.

(४) हे खरे आहे.

श्री.उत्तम अनंत मोळावडे, म्हावशी या अर्जदाराने माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत दिनांक १६ नोव्हेंबर, २०१२ रोजीच्या अर्जाद्वारे माहिती मागितलेली असून तत्कालीन अध्यक्ष / सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा समिती, म्हावशी, ता.पाटण, जि.सातारा यांनी अर्जदारास माहिती उपलब्ध करून दिल्याचे उपलब्ध झालेल्या कागदपत्रांवरून दिसून येत नाही.

(५) हे अंशत: खरे आहे.

सदर योजनेच्या कामाबाबत ग्रामस्थांकडून तक्रार प्राप्त झालेली नाही. तथापि, श्री.शंभूराज देसाई, मा.विधानसभा सदस्य यांनी दिनांक २९ मार्च, २०१५ च्या पत्रान्वये या योजनेचे काम अपूर्ण व निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांचेकडे तक्रार केली आहे.

(६) जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने दिनांक ११ मे, २०१६ च्या पत्रान्वये व स्मरणपत्रांन्वये योजनेच्या कामाची सखोल तपासणी त्रयस्थ तांत्रिक यंत्रणा म्हणून करुन घेण्याच्या दृष्टीने कराड अभियांत्रिकी महाविद्यालयास सुचित केले आहे. सदर अहवाल अद्याप प्रलंबित आहे.

-----------------

## परसोडी (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) येथे पाणीपुरवठा योजनेच्या कामात झालेली अनियमितता

**(४३) * ९२५६० डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परसोडी (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) येथे सन २०१६-२०१७ या कालावधीमध्ये पाणीपुरवठा योजने अंतर्गत विहीरीचे खोदकाम, पाईप टाकणे व इतर कामासाठी दहा लक्ष रुपये मंजूर करण्यात आले असल्याचे दिनांक २६ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामाकरिता भूजल यंत्रणेकडून पाणीसाठा उपलब्धतेबाबतचे प्रमाणपत्र न घेता विहीरीचे खोदकाम केले असल्याने सदर विहरीला पाणी लागले नाही तसेच पाणी पुरवठयासाठी टाकण्यात आलेले पाईप निकृष्ट दर्जाचे असल्याने जागो जागी फुटून सुरळीत पाणी पुरवठा होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच उक्त ठिकाणी सुरळीत पाणी पुरवठा होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

सदर योजनेकरीता समितीस पहिला हप्ता रु.५,६४,९७५/-, दि. २६/१२/२०११ रोजी व दुसरा हप्ता रु. ५,६४,९७५/-, दि. ३०/३/२०१३ रोजी देण्यात आला आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

सहायक भूवैज्ञानिक यांनी निश्चित केलेला प्रथम उद्भव कोरडा गेल्याने, दुसरा उद्भव घेण्यात आला. समितीने प्राप्त निधीतून योजनेचे उद्भव विहीरीचे काम पूर्ण केले असून, उंच टाकीचे किरकोळ कामे वगळता काम पुर्ण झाले आहे. योजनेत समाविष्ट असलेले पाईपलाईनचे काम अद्याप सुरु केलेले नाही.

सद्यस्थितीत, अस्तित्वातील योजनेद्वारे तसेच हातपंप व सार्वजनिक विहीरीतून पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(४) समितीकडून प्रतिसाद मिळत नसल्यामुळे तसेच समितीकडून तिस-या हप्त्याचा मागणी प्रस्ताव अप्राप्त असल्याने योजनेची कामे अपूर्ण आहेत. योजनेची कामे पुर्ण करण्याबाबत जिल्हा परिषद स्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे.

-----------------

## नागपूर शहरातील खाजगी शैक्षणिक संस्थांनी शाळेच्या स्कूल बस व व्हॅनच्या प्रवास शुल्कात वाढ केल्याबाबत

**(४४) * ९३१३३ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)नागपूर शहरातील खाजगी शैक्षणीक संस्थांनी आपल्या शाळेच्या स्कुल बस व व्हॅनच्या प्रवास शुल्कात १५ टक्यांनी वाढ केल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी शैक्षणिक संस्था आणि संस्थेत शिक्षण घेणारे बहुतांश विद्यार्थ्यांच्या घराचे अंतर हे कमाल ८ किलोमीटर असतांना स्कुल बस याकरीता प्रति माह १८०० रूपये आणी स्कुल व्हॅन प्रति माह १४०० रूपये पालकांकडुन घेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वाढीव शुल्कावर अंकूश ठेवण्याकरीता आदर्श शुल्क रचनेचा प्रस्ताव शासनाकडे प्रस्तावित आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने प्रस्तावित आदर्श शुल्क रचना मंजूर करुन खाजगी शिक्षण संस्थांच्या स्कूल बस तसेच स्कूल व्हॅन ला लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्ह्यातील विंधन विहीरीच्या कामांबाबत

**(४५) * ८४८५६ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यात सन २०१६-१७ या वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत खोदण्यात आलेल्या १०२ विंधन विहीरींची कामे पूर्ण झाली असून १६० कामे अपूर्ण असल्याची बाब दिनांक ११ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हापरिषद उपाध्यक्ष रत्नागिरी यांनी घेतलेल्या आढावा बैठकीत निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विंधन विहीरींच्या कामांबाबत आढावा घेतला असता ज्या गावांचा विंधन विहीरीसाठीचा प्रस्ताव मंजूर केलेला आहे त्या गावांचा या वर्षीच्या आराखड्यात समावेश करण्यात आला नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय,
(२) जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सन २०१६-१७ चा ३८२ विंधन विहिरीचा आराखडा मंजूर करण्यात आला होता. एकूण २६२ विंधन विहिरीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी २३४ कामे आराखडयातील आहेत. उर्वरित २८ कामे आराखडया बाहेरील असून उन्हाळयात पाणी टंचाई भासण्याची शक्यता असल्यामुळे तातडीची उपाययोजना म्हणून मंजूरी देण्यात आलेली आहे. या कामांचा जिल्हा वार्षिक योजनेच्या सन २०१७-१८ च्या आराखडयात समावेश करण्यात आलेला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा तालुका क्रीडा संकुलासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या अधिनस्थ असलेली जागा उपलब्ध करून देण्याबाबत

**(४६) * ८६९३१ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा तालुका क्रीडा संकुलासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या अधिनस्त असलेली जागा उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी बुलढाणा यांनी दिनांक ५ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुसार बुलढाणा तालुका क्रीडा संकुलासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या अधिनस्त असलेली जागा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था बुलडाणा या संस्थेस शासन निर्णय दि.२९ जानेवारी, २०१४ अन्वये जिल्हयातील शिक्षकांच्या प्रशिक्षणाची शिखर संस्था म्हणून घोषित केली असून, या संस्थेकडे उपलब्ध असलेल्या जागेमध्ये प्रशासकीय इमारत, मुलींचे वसतिगृह, अधिकारी /कर्मचारी निवासस्थान व संरक्षण भिंत यांच्या बांधकामासाठी केंद्र शासनाने (TEAB अंतर्गत) मान्यता दिली आहे. त्यानुसार महसूल व वन विभागाने पत्र क्र. जमीन ४४९७/प्र.क्र.२२९२/ज-९, दि.१४/०२/२००६ मा.जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना सदर जागा उपलब्ध करुन देता येणार नसल्याचे कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.